ह्या मार्गदर्शिकेत महाराष्ट्रात सामान्यतः अढळुन येणारी १३६ पक्ष्यांची माहिती दिलेली आहे. शोधायला सोपे जावे म्हणून पक्ष्यांना खालील पाच गटात विभागलेले आहे.

### पाणथळीवरील पक्षी

पाणथळ जागा म्हणजे सरोवरे, तलाव, नद्या, कांदळवने (खारफुटीच्या जागा), चिखलाच्या जागा तसेच दलदली होय. पक्ष्यांसाठी हे महत्वपूर्ण अधिवास असून पक्षी ह्या अधिवासाचा घरटे करण्यासाठी, विणीसाठी, खाद्य मिळवण्यासाठी, निवारा म्हणून तसेच पिण्याच्या पाण्यासाठी उपयोग करतात. ह्या गटात वर्णन केलेले बहुतेक पक्षी केवळ पाणथळीच्या ठिकाणी आढळून येतात (जसे बदके, पाणकावळे, चिखलपायटे पक्षी, बगळे, इ.). काही पक्षी (गाय बगळे, पांढऱ्या छातीचा धीवर, माळटिटवी) मात्र अनेकदा पाण्यापासून दूर दिसून येतात. अनेक स्थलांतरित पक्षी आपल्या पाणथळ जागांना हिवाळ्यात भेट देतात.

### शिकारी पक्षी

शिकारी पक्षी इतर प्राण्यांची तसेच छोट्या पक्ष्यांची शिकार करून खातात. त्यांची नजर तीक्ष्ण असते, पाय मजबूत असतात, शिकार पकडण्यासाठी नखे धारदार असतात, मांस फाडण्यासाठी चोच आकोड्यासारखी असते. ह्या गटात वर्णन केलेल्या पक्ष्यांपैकी काही (घार, सागरी घार, शिक्रा) मानवी वस्ती जवळ राहतात तर काही (भोवत्या, खरूची, मधुबाज) खुल्या अधिवासात, जसे शेतीप्रदेशात/ झुडूपी प्रदेशात राहतात. शिकारी पक्षी हिवाळ्यात पाणथळीच्या ठिकाणी मोठ्या संख्येत जमलेल्या पाणपक्ष्यांची शिकार करताना दिसतात.

### जमिनीवर खाद्य शोधणारे पक्षी

जमिनीवर खाद्य शोधणाऱ्या पक्ष्यांमध्ये प्रामुख्याने भूनिवासी आणि जमिनीवर उदरभरण करणाऱ्या पक्ष्यांचा समावेश होतो. त्यात काही आकाराचे पक्षी जसे तित्तीर, लावा, मोर, रानकोंबडी, कावळे, तसेच मध्यम आकाराचे पक्षी जसे सातभाई, साळुंक्या व मैना, आणि चिमण्या व मनोल्यासारखे छोटे पक्षी येतात. धोबी सारखे काही जमिनीवर उदरभरण करणारे पक्षी पाणथळीच्या ठिकाणी दिसत असले तरी त्यांचा आवडता अधिवास म्हणजे खुल्या जागा तसेच झुडूपी प्रदेश होय. ह्या गटात खाटिक, निलपंख आणि गप्पीदास सारखे छोट्या झुडुपावर बसणारे पण जमिनीवर खाद्य मिळवणारे पक्षी सुद्धा अंतर्भूत केले आहेत.

### हवेत खाद्य मिळविणारे पक्षी

हवेत खाद्य मिळविणारे भिंगरी आणि पाकोळी सारखे पक्षी कीटकभक्षी असून हवेत उडतानाच भक्ष्य पकडून उदरभरण करतात. त्यांचे पंख टोकदार असून ते सफाईदारपणे ते हवेत संचार करताना अथवा कीटक पकडण्यासाठी हवाई कसरती करताना दिसतात. ते वेगाने उडतात, खुले प्रदेश त्यांना प्रिय असून कधीकधी ते पाण्याजवळ दिसतात. पहाटे व सायंकाळी ते थव्याने तारांवर बसलेले दिसतात.

### वृक्षनिवासी पक्षी

वृक्षनिवासी पक्ष्यांमध्ये ज्यांचे जीवनचक्र झाडा-झुडूपांशी संबंधित आहे अश्या विविध प्रकारच्या पक्ष्यांचा समावेश होतो, जसे जंगलात आढळणारे, खुल्या वनात आढळणारे तसेच शहरी बगीच्यांमध्ये आढळणारे पक्षी. अनेक वृक्षनिवासी पक्षी (धनेश, बुलबुल, तांबट, कुटूरगा, पोपट, अनेक पारवे) छोट्या-मोठ्या फळांवर गुजराण करतात. काही मात्र झाडाच्या सालीखाली लपलेले कीटक (सुतार), पानांमध्ये लपलेले कीटक, अळ्या (कोकीळ वर्गीय, पावश्या, चातक, हळद्या, वटवटे), किंवा उडणारे कीटक (माशीमार, कोतवाल, वेडे राघू) खातात. शिंजीरासारखे काही पक्षी फुलांमधील मधुरस खातात. साधारणतः छोट्या प्रजाती झाडाची खालची बाजू तर मोठ्या प्रजाती वरील बाजू पसंत करतात.

नर ♂ / मादी ♀ — जर नर-मादी भिन्न दिसत असतील तर त्यासाठी ही लिंग-दर्शक चिन्हे वापरण्यात आली आहेत. जर असे चिन्ह दिलेले नसेल तर नर-मादी एकसारखे दिसतात असे समजावे.

हिमालय अथवा मध्य एशिया/ युरोप येथून महाराष्ट्रात हिवाळ्यात (ऑक्टोबर-मार्च) स्थलांतर करून येणारे स्थलांतरित पक्षी.

आकारमान म्हणजे चोचीच्या टोकापासून तर शेपटीच्या टोकापर्यंतची लांबी.

br म्हणजे विणीच्या हंगामातील पिसारा.

पक्ष्यांची रेखाचित्रे रिचर्ड ग्रिमेट, कॅरोल इंस्कीप व टिम इंस्कीप ह्यांच्या ‟बर्डस ऑफ दि इंडियन सबकॉन्टीनेंट” ह्या पुस्तकातून पूर्वपरवानगीने वापरली आहेत.

Kasambe, R. (2016): Standard Marathi names of birds found in Maharashtra. Bombay Natural History Society and Maharashtra Pakshimitra Sanghatana pp.24.

www.early-bird.in
www.pakshimitra.org
CONTENT Garima Bhatia
MARATHI TRANSLATION Dr. Raju Kasambe
COVER PHOTOGRAPH Greater Flamingo by Saurabh Sawant

महाराष्ट्रातील पक्षी - १३६ सामान्य पक्ष्यांची मार्गदर्शिका

# महाराष्ट्रातील पक्षी
# Birds of Maharashtra



१३६ सामान्य पक्ष्यांची मार्गदर्शिका
a pocket guide to 136 familiar birds

## पाणथळीवरील पक्षी

हळदीकुंकू बदक ♀ ♂
Spot-billed Duck
60 cm

बदके उदरभरण हे जलपृष्ठावर करतात.

वारकरी/ पाणकोंबडी बदकासारखे दिसत असले तरी त्यांच्या पायाच्या बोटांमध्ये पडदे नसतात.

तलवार बदक ♀ ♂ (स्थलांतरित)
Northern Pintail
55 cm

थापट्या बदक ♀ ♂ (स्थलांतरित)
Northern Shoveler
50 cm

अडई
Lesser Whistling-Duck
42 cm

वारकरी
Eurasian Coot
42 cm

भुवई बदक ♀ ♂ (स्थलांतरित)
Garganey
39 cm

चक्रवाक (स्थलांतरित)
Ruddy Shelduck
64 cm

छोटा पाणकावळा
Little Cormorant
51 cm

पाणकावळे संपूर्ण काळ्या रंगाचे पक्षी असून बरेचदा ते तलावाच्या काठावरील अथवा तलावातील झाडावर पंख वाळवत बसून असतात.

काळी पाणकोंबडी
Common Moorhen
32 cm

भारतीय पाणकावळा
Indian Cormorant
63 cm

टिबुकली
Little Grebe
27 cm

माळटिटवी
Yellow-wattled Lapwing
27 cm

मासे पकडण्यासाठी टिबुकल्या बरेचदा पाण्यात बुडी मारतात.

टिटव्या अनेकदा पाण्यापासून दूर शेतीप्रदेशात आढळून येतात.

टिटवी
Red-wattled Lapwing
33 cm

जांभळी पाणकोंबडी
Grey-headed (Purple) Swamphen
43 cm

पाणकोंबड्या दलदलीच्या प्रदेशात तसेच पाणथळीच्या ठिकाणी पाणवनस्पतींमध्ये आढळतात.

पांढऱ्या छातीची पाणकोंबडी
White-breasted Waterhen
32 cm

छोटा टिलवा (स्थलांतरित)
Little Stint
13 cm

छोटा कंठेरी चिखल्या
Little Ringed Plover
16 cm

सामान्य तुतारी (स्थलांतरित)
Common Sandpiper
20 cm

तुतारी, चिखल्या आणि टिलवा सारखे चिखलपायटे पक्षी पाणथळीकाठच्या दलदली भागात आढळतात.

ठिपकेवाली तुतारी (स्थलांतरित)
Wood Sandpiper
20 cm

हिरवी तुतारी (स्थलांतरित)
Green Sandpiper
23 cm

सामान्य टिलवा (स्थलांतरित)
Common Redshank
28 cm

सामान्य हिरवा टिलवा (स्थलांतरित)
Common Greenshank
32 cm

धीवर पक्ष्यांचे डोके मोठे, चोच मजबूत आणि पाय आखूड असतात.

सुरय पक्ष्यांचे पंख लांब, टोकाला अनुकुचीदार असून ते डौलदारपणे उडतात.

कवड्या धीवर
Pied Kingfisher
25 cm

सामान्य धीवर
Common Kingfisher
16 cm

पांढऱ्या छातीचा धीवर
White-throated Kingfisher
27 cm

कल्लेदार सुरय (स्थलांतरित)
Whiskered Tern
24 cm

नदी सुरय
River Tern
42 cm

तपकिरी डोक्याचा कुरव (स्थलांतरित)
Brown-headed Gull
42 cm

छोटा बगळा
Little Egret
63 cm

मध्यम बगळा (br)
Intermediate Egret
80 cm

मोठा बगळा
Great Egret
90 cm

ढोकरी (br)
Indian Pond-Heron
46 cm

बगळे/ ढोकरी हे मध्यम ते मोठ्या आकाराचे पक्षी असून त्यांचे पाय व मान लांब असतात. चोच जाड व टोकदार असते.

राखी बगळा
Grey Heron
96 cm

गाय बगळा (br)
Cattle Egret
51 cm

जांभळा बगळा
Purple Heron
86 cm

रात ढोकरी
Black-crowned Night-heron
58 cm

काळ्या डोक्याचा शराटी
Black-headed Ibis
60 cm

मोर शराटी
Glossy Ibis
60 cm

शराटी, करकोचा, चमचा हे आकाराने मोठे पक्षी असून त्यांचे उडणे म्हणजे हळुवारपणे केलेली पंखांची फडफड असते. त्यांच्या चोचींची रचना भिन्न असते.

काळा शराटी
Red-naped Ibis
73 cm

उघड्या चोचीचा करकोचा
Asian Openbill
68 cm

रंगीत करकोचा
Painted Stork
96 cm

पांढऱ्या मानेचा करकोचा
Woolly-necked Stork
83 cm

मोठा रोहित
Greater Flamingo
135 cm

चमचा
Eurasian Spoonbill
85 cm

कांस्य-पंखी कमळपक्षी
Bronze-winged Jacana
30 cm

पायांची बोटे लांब असल्यामुळे कमळपक्षी तरंगत्या पाणवनस्पतींवर अलगद चालू शकतात.

शेकाटे पक्षी आकाराने छोटे असून त्यांचे पाय तसेच चोच लांब असते.

शेकाट्या
Black-winged Stilt
25 cm

## शिकारी पक्षी

सामान्य खरूचि ♂ ♀ (स्थलांतरित)
Common Kestrel
32 cm

खरुचि बरेचदा घिरट्या घालताना दिसतात तर सभोवतीच्या दलदलीवर अथवा माळरानावर अगदी खालून तरंगताना दिसतात.

दलदली भोवत्या ♂ ♀ (स्थलांतरित)
Marsh Harrier
50 cm

शिक्रा
Shikra
35 cm

मधुबाज
Oriental Honey Buzzard
60 cm

तिसा
White-eyed Buzzard
43 cm

गरूड / बाज मोठ्या आकाराचे शिकारी पक्षी असून छोट्या प्राण्यांची आणि छोट्या पक्ष्यांची शिकार करतात.

तुरेवाला सर्पगरुड
Crested Serpent Eagle
65 cm

घार
Black Kite
60 cm


समुद्री घार
Brahminy Kite
48 cm

कापशी घार
Black-winged Kite
35 cm

घारी शिकारी पक्षी असून बरेचदा मानवी वस्तीजवळ घिरट्या घालताना दिसतात.

घुबडे निशाचर पक्षी असून दिवसा ते झाडाच्या ढोलीत विश्रांती करतात.

ठिपकेवाला पिंगळा
Spotted Owlet
21 cm



## जमिनीवर खाद्य शोधणारे पक्षी

रानकोंबडी, लावा, तित्तिर, चकोत्री हे पक्षी स्थूल अंगाचे असून अगदी थोड्या अंतरापर्यंत उडतात.

कावळ्यांची चोच लांब व सरळ असून ते नेहमी गलका करत असतात.

राखी तित्तिर
Grey Francolin
33 cm

कावळा
House Crow
40 cm

♀ ♂
मोर (नर), लांडोर (मादी)
Indian Peafowl
110 cm (m) 85 cm (f)

डोकावळा
Large-billed Crow
47 cm

सातभाई नेहमी जमिनीवर उड्या मारीत, कलकल करीत, थव्याने फिरताना दिसतात.

हुदहुद पक्ष्याची चोच लांब व बाकदार असून सावध असताना त्यांच्या डोक्यावरील तुरा उभा होतो.

जंगली सातभाई
Jungle Babbler
25 cm

पिवळ्या डोळ्याचा सातभाई
Yellow-eyed Babbler
18 cm

राखी सातभाई
Large Grey Babbler
28 cm

हुदहुद
Hoopoe
31 cm

साळुंकी
Common Myna
25 cm


भांगपाडी मैना
Brahminy Starling
21 cm

जंगली मैना
Jungle Myna
23 cm

मैना/ साळुंकी विविध कर्कश आवाज काढतात. ते जमिनीवर तसेच झाडावर खाद्य शोधतात. रात्रीच्या निवाऱ्याला ते थव्याने झोपतात.

गुलाबी मैना
Rosy Starling
21 cm

कवडी मैना
Asian Pied Starling
23 cm



दयाळ/चीरक जमिनीवर टणाटणा उड्या मारीत व शेपटी उभी करून फिरतात.

गप्पीदास/ थिरथिरा झुडुपावर अथवा एखाद्या खालच्या फांदीवर बसतात.

♀ ♂
चीरक
Indian Robin
19 cm

♂ ♀
कवड्या गप्पीदास
Pied Bushchat
13 cm

दयाळ
Oriental Magpie Robin
20 cm

♂ ♀
सामान्य गप्पीदास
Siberian Stonechat
13 cm

धोबी/ तीरचिमणी सडपातळ बांध्याचे पक्षी असून शेपटी हलवीत जमिनीवर चालतात.

करडा धोबी
Grey Wagtail
19 cm

♂ ♀
काळा थिरथिरा
Black Redstart
15 cm

पांढऱ्या भुवईचा धोबी
White-browed Wagtail
21 cm

पांढरा धोबी
White Wagtail
19 cm

पिवळा धोबी
Western Yellow Wagtail
18 cm

धान तीरचिमणी
Paddyfield Pipit
15 cm

भारतीय नीलपंख
Indian Roller
33 cm

लांब शेपटीचा खाटीक
Long-tailed Shrike
25 cm


उदीपाठीचा खाटीक
Bay-backed Shrike
17 cm

खाटिक/ नीलपंख एखाद्या खालच्या फांदीवर बसून जमिनीवरील शिकार शोधतात.

चंडोल निस्तेज रंगाचे पक्षी असून त्यांचे गाणे कर्णमधुर असते.

तांबूस-शेपटीचा चंडोल
Rufous-tailed Lark
16 cm

लालपंखी चंडोल
Indian Bushlark
14 cm



नवरंग
Indian Pitta
19 cm

नवरंग रंगीबेरंगी स्थूल अंगाचा पक्षी असून त्याची शेपूट आखूड असते.

♀ ♂
चिमणी
House Sparrow
15 cm

चिमण चंडोल
Ashy-crowned Sparrow Lark
13 cm

पांढऱ्या कंठाची मनोली
Indian Silverbill
11 cm

चिमणी, सुगरण आणि मनोली बिजाहारी पक्षी असून त्यांची चोच जाड व त्रिकोणी असते.

♀ ♂
सुगरण
Baya Weaver
15 cm

♀ ♂
लाल मनोली
Red Avadavat
10 cm

ठिपकेवाली मनोली
Scaly-breasted Munia
11 cm

पवळ्या कंठाची चिमणी
Chestnut-shouldered Petronia
14 cm

## हवेत खाद्य मिळविणारे पक्षी

धूसर कडा पंकोळी
Dusky Crag-Martin
13 cm


लांब, टोकदार पंख असून त्यांचे शरीर वायुगतिक असते. बहुतेक वेळ ते उडण्यात व्यतीत करतात.

तारवाली भिंगरी
Wire-tailed Swallow
14 cm

माळ भिंगरी
Barn Swallow
18 cm

लाल पुठ्ठ्याची भिंगरी
Red-rumped Swallow
16 cm

घर पाकोळी
Little Swift
15 cm



## वृक्षनिवासी पक्षी

बुलबुल गाणारे पक्षी असून ते नेहमी थव्याने राहतात.

कुटूरगा/ तांबट पक्ष्यांच्या जाड चोचीजवळ झुबका असतात

लाल बुड्या बुलबुल
Red-vented Bulbul
20 cm

शिपाई बुलबुल
Red-whiskered Bulbul
20 cm

तपकिरी डोक्याचा कुटूरगा
Brown-headed Barbet
27 cm

तांबट
Coppersmith Barbet
17 cm

धनेश हे मोठ्या आकाराचे पक्षी असून त्यांची चोच मोठी तसेच बाकदार असते.

पोपटांचा आवाज कर्कश असून ते नेहमी थव्याने उडतात.

भारतीय राखी धनेश
Indian Grey Hornbill
50 cm

पोपट
Rose-ringed Parakeet
42 cm

♂ ♀
टोई पोपट
Plum-headed Parakeet
36 cm

करण पोपट
Alexandrine Parakeet
53 cm

भारद्वाज
Greater Coucal
48 cm

टकाचोर
Rufous Treepie
48 cm


♂ ♀
कोकीळ
Asian Koel
43 cm

भारव्दाज तसेच टकाचोर पक्ष्यांची शेपटी लांब असते.

कोकीळ/ पावश्या/ चातक पक्ष्यांचे शरीर व शेपूट लांब असते. त्यांचा आवाज जोमदार असून तो वारंवार केला जातो.

चातक
Pied Cuckoo
33 cm

पावश्या
Common Hawk Cuckoo
34 cm



पारवा
Rock Pigeon
33 cm

पारवा/ होला/ हरोळी गुबगुबीत पक्षी असून त्यांची मान आखूड असते. मुख्यतः वृक्षनिवासी असले तरी खाद्य शोधण्यासाठी ते जमिनीवर उतरतात.

ठिपकेवाला होला
Spotted Dove
30 cm

छोटा तपकिरी होला
Laughing Dove
27 cm

कंठवाला होला
Eurasian Collared-Dove
32 cm

हळद्या चटकदार रंगाचे पक्षी असून त्यांचे गाणे बासरीसारखे मंजुळ असते.

सुतार पक्ष्यांची चोच झाडाच्या बुंधा टोकरून खाद्य शोधण्यासाठी मजबूत असते.

हळद्या
Indian Golden Oriole
25 cm

पिवळ्या पायाची हरोळी
Yellow-footed Pigeon
33 cm

बुरखाधारी हळद्या
Black-hooded Oriole
25 cm

♂ ♀
छोटा सोनपाठी सुतार
Black-rumped Flameback
27 cm

कोतवाल पक्षी एकदम ताठ बसतात. त्यांची शेपटी दुभंगलेली असते.

सुभग छोटा पण चंचल पक्षी असून त्याचे गाणे

कोतवाल
Black Drongo
28 cm

राखी कोतवाल
Ashy Drongo
29 cm


सुभग
Common Iora
14 cm

पांढऱ्या कंठाची नाचण
Spot-breasted Fantail
19 cm

माशिमार/नाचण ह्या पक्ष्यांची चोच छोटी व चपटी असते. एखाद्या फांदीवर बसून ते जवळपास उडणाऱ्या कीटकांची हवेतल्या हवेत शिकार साधतात.

टिकेलची निळी माशीमार
Tickell's Blue Flycatcher
14 cm

स्वर्गीय नर्तक
Indian Paradise Flycatcher
20 cm



राखी/ साधा वटवट्याची शेपटी लांब असून ते नेहमी शेपटी हलवीत असतात.

रेषाळ वटवट्या आणि शिंपी बहुतेक छोट्या झुडूपांमध्ये आढळतात.

साधा वटवट्या
Plain Prinia
13 cm

राखी वटवट्या
Ashy Prinia
13 cm

रेषाळ वटवट्या
Zitting Cisticola
10 cm

शिंपी
Common Tailorbird
13 cm

वटवटे फिक्कट रंगाचे पण अतिशय चुळबुळे पक्षी आहेत.

गोमेट आणि वेडे राघू बारीक चणीचे असून नेहमी थव्याने आढळतात.

छोटा शुभ्रकंठी वटवट्या
Lesser Whitethroat
13 cm

हिरवट वटवट्या
Greenish Warbler
10 cm

वटवट्या
Blyth's Reed Warbler
13 cm

वेडा राघू
Green Bee-eater
17 cm

फुलटोचे भारतातील आकाराने सर्वात छोटे पक्षी आहेत.

शिंजीर रंगीबिरंगी असून त्यांची चोच बारीक, बाकदार व लांब असते.

♀ ♂
छोटा गोट
Small Minivet
16 cm

टिकेलचा फुलटोचा
Pale-billed Flowerpecker
8 cm

♀ ♂
जांभळ्या पुठ्ठ्याचा शिंजीर
Purple-rumped Sunbird
10 cm

♀ ♂
जांभळा शिंजीर
Purple Sunbird
10 cm

चष्मेवाला पक्षी नेहमी किलबिलाट करीत थव्याने आढळतो.

रामगंगा पक्षी अतिशय चंचल, छोटा असून त्याची चोच छोटी असते.

कवडी रामगंगा
Cinereous Tit
14 cm

चष्मेवाला
Oriental White-eye
10 cm